सेन्सेक्स : ६२,९६९.१३ ▲ १२२.७५ (०.२०%) । निफ्टी : १८,६३३.८५ ▲ ३५.२० (०.१९%) । डॉलर/₹ : ८२.७० ▲ ७ पैसे । तेल / $ ७५.३० ▼ २.३०%

उच्चांकी आगेकूच

सलग चौथ्या सत्रातील वाढीसह निफ्टी १८,६०० वर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : विदेशी गुंतवणुकीचा सशक्त प्रवाह आणि मजबूतपणे बंद झालेले आशियाई बाजार हे स्थानिक भांडवली बाजारात सलग चौथ्या व्यवहार सत्रात निर्देशांकांच्या वाढीला बळ देणारे ठरले. परिणामी सेन्सेक्स १२३ अंशांनी वधारला तर निफ्टी १८,६००च्या वर मंगळवारी बंद झाला.

वित्तीय, बँकिंग, भांडवली वस्तू आणि औद्योगिक समभागांतील सरशीमुळे प्रमुख निर्देशांकांना मंगळवारच्या व्यवहारात सकारात्मक वळणास मदत मिळाली. निवडक धातू, माहिती-तंत्रज्ञान तसेच तेल आणि वायू समभागांतील विक्रीने मात्र प्रमुख निर्देशांकांमध्ये वाढीला मर्यादा पडल्या.

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १२२.७५ अंशांनी (०.२० टक्के) वाढून ६२,९६९.१३ म्हणजे ६३ हजारांच्या वेशीवर स्थिरावला. दिवसभरात तो १८९.७४ अंशांनी वाढून ६३,०३६.१२ उच्चांकापर्यंत झेपावला होता. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी निर्देशांक ३५.२० अंशांनी (०.१९ टक्के) वाढून तांत्रिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा १८,६३३.८५ पातळीवर बंद झाला.

यंदा जाहीर झालेल्या चौथ्या तिमाहीच्या निकालांनी कंपन्यांच्या मागणीत सुधारणा दर्शविल्याने देशांतर्गत भांडवली बाजाराने तेजी कायम ठेवली आहे. पुढे, सामान्य पर्जन्यमानाची अपेक्षा आणि आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या किमतीतील घट यामुळे कंपन्यांच्या नफाक्षमतेतही वाढ होण्याची बाजाराला आशा आहे, असे जिओजित फायनान्शिअल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले.

सेन्सेक्समध्ये हॉटेल ते सिगारेट उत्पादनासह विविधांगी व्यवसाय स्वारस्य असलेल्या आयटीसी लिमिटेडचे योगदान सर्वात मोठे राहिले. मंगळवारच्या सत्रात हा समभाग २.३१ टक्क्यांनी वाढला. बजाज फिनसर्व्ह, कोटक महिंद्र बँक, बजाज फायनान्स, ॲक्सिस बँक, एचसीएल टेक्नॉलॉजीज, विप्रो, अल्ट्राटेक सिमेंट, मारुती आणि इन्फोसिस या प्रमुख कंपन्यांचे समभागही वधारले. दुसरीकडे, सेन्सेक्स समभागांमध्ये टेक महिंद्रा सर्वात जास्त १.२७ टक्क्यांनी घसरला. टाटा स्टील, नेस्ले, लार्सन अँड टुब्रो, टीसीएस, टाटा मोटर्स आणि टायटन हे पिछाडीवर राहिले.

व्यापक बाजारपेठेत खरेदीपूरक वातावरण होते. परिणामी बीएसई स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांक देखील अनुक्रमे ०.२२ टक्क्यांनी आणि ०.१६ टक्क्यांनी वाढले.

‘बँक निफ्टी’चा विक्रमी सूर

गेल्या आठवड्यातील गुरुवारपासून बाजार तेजीत आहे. चार दिवसांच्या तेजीत सेन्सेक्स १,१९५ अंशांनी म्हणजेच २ टक्क्यांनी, तर निफ्टी निर्देशांक ३४८ अंशांनी अर्थात २.२६ टक्क्यांनी वधारला आहे. बाजार विक्रमी उच्चांकाकडे कूच करीत आहे. मंगळवारी बँक निफ्टी निर्देशांकाने वार्षिक-उच्चांक गाठला. एप्रिलपासून सुरू असलेल्या विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह, ४५० अब्ज रुपयांच्या पुढे गेला आहे. तथापि, संमिश्र जागतिक संकेत बाजाराच्या आगेकूचीला मर्यादा आणत आहेत.

सर्वाधिक गैरव्यवहार खासगी बँकांमध्ये !

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : बँकिंग क्षेत्रातील घोटाळ्यांमध्ये सरलेल्या २०२२-२३ आर्थिक वर्षात वाढ झाली असून, या वर्षात उघडकीस आलेल्या एकूण १३,५३० गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये सर्वाधिक वाटा हा खासगी क्षेत्रातील बँकांचा आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून गैरव्यवहारांचे प्रमाण तुलनेने कमी असले, घोटाळ्यांद्वारे झालेल्या एकूण ३०,२५२ कोटी रुपयांच्या फसवणुकीत सर्वाधिक रक्कम ही सरकारी बँकांनीच गमावली, असे मंगळवारी प्रसिद्ध झालेला रिझर्व्ह बँकेचा अहवाल सांगतो.

आधीच्या म्हणजेच, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ९,०९७ बँक गैरव्यवहारांची नोंद झाली होती आणि त्यातून ५९,८१९ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती. यंदा मार्च २०२३ अखेर संपलेल्या वर्षात गैरव्यवहारांची संख्या वाढली असली तरी फसवणुकीची रक्कम घटून निम्म्याहून अधिक (५५ टक्के) खाली आली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालानुसार, सर्वाधिक गैरव्यवहाराच्या घटना २०२२-२३ मध्ये कार्ड आणि इंटरनेटच्या माध्यमातून झालेल्या डिजिटल व्यवहारांमध्ये घडल्या आहेत. जास्त रकमेचे गैरव्यवहार कर्ज प्रकरणांमधून झाले आहेत.

मागील तीन वर्षांतील एक लाख रुपयांवरील गैरव्यवहारांच्या विचार या अहवालात करण्यात आला आहे. क्षेत्रनिहाय बँकांचा विचार करता खासगी बँकांमध्ये सर्वाधिक गैरव्यवहारांची नोंद झाली असून, गैरव्यवहाराच्या रकमेचा विचार करता सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाटा जास्त आहे. आधीच्या दोन वर्षांच्या तुलनेत २०२२-२३ आर्थिक वर्षात गैरव्यवहारांच्या रकमेत ५५ टक्के घट झाली आहे, असे अहवालाने नमूद केले आहे.

कार्ड अथवा इंटरनेटच्या माध्यमातून गैरव्यवहार होण्याचे प्रकार कमी रकमेचे असून, ते प्रामुख्याने खासगी बँकांमध्ये घडले आहेत. सार्वजनिक बँकांमध्ये कर्जाशी निगडित गैरव्यवहाराची प्रकरणे मोठ्या संख्येने पुढे आली आहेत.

ई-रुपयाच्या वितरणात वाढ

रिझर्व्ह बँकेने ई-रुपया (सीबीडीसी) चलनात आणला. हा पथदर्शी प्रकल्प आहे. मार्चअखेरीस वितरणातील घाऊक ई-रुपयाचे मूल्य ११०.६९ कोटी रुपये आणि किरकोळ ई-रुपयाचे मूल्य ५.७० कोटी रुपये आहे.

जनविरोध, भूसंपादनातील अडथळे टाळण्यासाठी

छोटे पेट्रो-रिफायनरी प्रकल्प केंद्राच्या विचाराधीन

पीटीआय, नवी दिल्ली

वार्षिक ४५ कोटी मेट्रिक टन क्षमतेचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी छोट्या पेट्रोलियम रिफायनरी उभारण्याचा सरकार विचार करत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय तेलमंत्री हरदीप सिंग पुरी यांनी मंगळवारी येथे केले. राज्यात रत्नागिरी जिल्ह्यांत प्रस्तावित महाकाय रिफायनरी प्रकल्पाला होत असलेल्या स्थानिकांचा विरोधाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे विधान महत्त्वपूर्ण ठरते.

इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीतर्फे येथे आयोजित ऊर्जा शिखर परिषदेपुढे बोलताना पुरी म्हणाले की, छोट्या रिफायनरीज प्रकल्पांमध्ये भूसंपादन आणि अन्य अडथळे निर्माण होण्याचे प्रमाण कमी असेल. उल्लेखनीय म्हणजे इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या सरकारी तेल कंपन्यांनी महाराष्ट्रात रत्नागिरी येथे वार्षिक सहा कोटी मेट्रिक टन क्षमतेची रिफायनरी स्थापन करण्याची योजना आहे. प्रथम नाणार येथे प्रस्तावित हा प्रकल्प जनविरोधानंतर, बारसू-सोलगांव येथे हलविण्यात आला, पण तेथेही ग्रामस्थांकडून विरोध आणि अडथळ्यांमुळे या प्रकल्पाचे काम रखडले आहे.

सध्या भारताची तेल शुद्धीकरण क्षमता २५.२ कोटी मेट्रिक टन इतकी आहे, ती ४५ कोटी मेट्रिक टनावर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. नवीन मोठ्या रिफायनरीजची स्थापना करणे जास्त खर्चीकही ठरत आहे. त्यामुळे साधारण २ कोटी मेट्रिक टन वार्षिक क्षमता असणाऱ्या छोट्या रिफायनरी प्रकल्प मोठ्या संख्येने स्थापण्याच्या संधी आम्ही शोधत आहोत. जर आम्ही खूप मोठ्या आकाराचे प्रकल्प आणले तर भूसंपादन आणि इतर समस्या आडव्या येतात, असे आढळून येत असल्याचे पुरी यांनी पुढे बोलताना सांगितले.

वार्षिक ४५ कोटी मेट्रिक टनांच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी आणखी काही धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

नोटा छपाईसाठी ४,६८२ कोटी खर्च

मुंबई : रिझर्व्ह बँकेला आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये नोटा छपाईसाठी एकूण ४,६८२ कोटी रुपयांचा खर्च आला. आधीच्या वर्षात हा खर्च ४,९८४ कोटी रुपये होता. मागील आर्थिक वर्षात दोन हजारांच्या खराब झालेल्या अथवा फाटक्या ४,८२४ लाख नोटा नष्ट करण्यात आल्या. त्याआधीच्या वर्षात अशा ३,८४७ लाख नोटा नष्ट करण्यात आल्या होत्या.

ॲमेझॉन फ्रेशचा ६० शहरांत विस्तार

मुंबई : ॲमेझॉन इंडियाने तिच्या किराणा व्यवसाय अंग असलेल्या ॲमेझॉन फ्रेशचा देशभरात ६० हून अधिक शहरांमध्ये विस्तार पूर्ण केला आहे. फळे, भाज्या यांसारखी नाशिवंत उत्पादने, रेफ्रिजरेटेड उत्पादने, सौंदर्य निगा, बाळाची काळजी, वैयक्तिक निगा व किराणा उत्पादने आकर्षक किंमतीसह ॲमेझॉन फ्रेश सादर करते.

बीएलएस इंटरनॅशनलचा स्पॅनिश सरकारशी करार

मुंबई : पारपत्र (व्हिसा) अर्जाच्या छाननीचे कार्य सोपवणारा जागतिक करार बीएलएस इंटरनॅशनल या कंपनीशी स्पेनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने नुकताच केला. ही कंपनी २०१६ पासून स्पॅनिश सरकारला ही सेवा देत असून, सलग दुसऱ्यांदा हे काम तिने पटकावले आहे.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड.

सूचना

आरएफबी क्र: एमआरव्हीसी/डब्ल्यू/१३६/जीएस/मिड–सेक्शन/अतिक्रमण नियंत्रण कार्य/सीआर दिनांक: ३१.०५.२०२३

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. (एमआरव्हीसी) ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय २रा मजला चर्चगेट स्टेशन इमारत, चर्चगेट, मुंबई–४०००२०, भारत येथे आहे, त्यांचे द्वारे मध्य रेल्वे **(छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – कसारा, कल्याण– कर्जत आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – पनवेल)** च्या मुंबई डिव्हिजनच्या उपनगरीय सेक्शन मध्ये मिडसेक्शन अतिक्रमण नियंत्रण प्रकल्प संबंधी एफओबी, लिंक वे/हाय वॉक, सबवे, पाथवे आणि इतर सेवा इमारतींचे विद्युत सामान्य–सेवा कार्य करिता एक टप्पा एक पाकिट पद्धती अंतर्गत ई–बोली मागविण्यात येत आहेत.

कोरे बोली दस्तावेज संकेतस्थळ **https://eprocure.gov.in** वर उपलब्ध आहेत. बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी संकेतस्थळ **https://eprocure.gov.in** वरून सर्व दस्तावेज डाउनलोड करावे. ई–बोली दस्तावेज **दि. ३१.०५.२०२३ ते दि. १८.०७.२०२३ रोजी १२.३०** पर्यंत डाउनलोड केले जाऊ शकतात. ई–बोली जमा करण्याची शेवटची तारीख **दि. १८.०७.२०२३ रोजी १२.३०** वा. पर्यंत आहे. बोली **दि. १८.०७.२०२३ रोजी १५.३०** वा. उघडण्यात येईल. अधिक माहितीसाठी कृपया **https://eprocure.gov.in** वर स्पेसिफिक प्रोक्योरमेंट नोटीस (एसपीएन) पहा.

सार्वजनिक सूचना

भारतीय रिझर्व बँकेद्वारा (''आरबीआय'') जारी करण्यात आलेल्या प्रमुख निर्देश – नॉन–बँकिंग वित्तीय कंपनी – सिस्टिमिकली महत्त्वाची ठेवी न स्वीकारणारी कंपनी आणि ठेवी स्वीकारणारी कंपनी (रिझर्व बँक) निर्देश, २०१६ (''आरबीआयचे निर्देश'') मधील परिच्छेद ६९ अन्वये रिलायन्स स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड (''आरएसआयएल'') आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (''आरआयएल'') द्वारा संयुक्तरित्या ही सूचना जारी करण्यात येत आहे.

आरएसआयएल (सीआयएन: U65990MH1999PLC120918) ही ठेवी न स्वीकारणारी सिस्टिमकली महत्त्वाची नॉन–बँकिंग वित्तीय कंपनी असून आरबीआयकडे नोंदणीकृत आहे. आरआयएल (सीआयएन: L17110MH1973PLC019786) ही लिस्टेड सार्वजनिक कंपनी असून सध्या तिच्याकडे आरएसआयएलचे १००% इक्विटी समभाग आहेत.

आरएसआयएल आणि आरआयएल यांच्या संचालक मंडळांनी इतर गोष्टींबरोबरच संपूर्ण वित्तीय सेवा व्यवसायावर लक्ष केंद्रित करणारी स्वतंत्र लिस्टेड कंपनी निर्माण करण्याच्या उद्देशाने आरआयएलचा वित्तीय सेवा व्यवसाय आरएसआयएल मध्ये विलग करण्याच्या व्यवस्थेची योजना (''योजना'') मंजूर केली आहे. सदर योजना आरएसआयएल आणि आरआयएल यांचे भागधारक आणि कर्जदार यांनी मंजूर केली आहे आणि सध्या माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांच्याकडे मंजुरीसाठी बाकी आहे. योजनेची पूर्तता झाल्यानंतर आणि त्या अनुषंगाने: (१) आरएसआयएल आरआयएलची उपकंपनी राहणार नाही आणि आरआयएल कडे आरएसआयएलची समभागधारणा राहणार नाही; (२) आरएसआयएलची स्टॉक एक्सचेंजमध्ये लिस्ट करण्यात येईल; (३) आरआयएलचे भागधारक आरएसआयएलचे भागधारक बनतील आणि (४) आरआयएलचे विद्यमान प्रवर्तक आणि प्रवर्तक समूह हे आरएसआयएलचे प्रवर्तक व प्रवर्तक समूह बनतील.

वरील समभागधारणेतील बदल आणि आरएसआयएलवरील नियंत्रणातील बदल हे आरबीआयने त्यांचे पत्र संदर्भ क्रमांक डीओएस.सीओ.आरएसजी क्र. एस५४८/०२–१३–००१/२०२३–२४ दिनांक २५ एप्रिल, २०२३ अन्वये मंजूर केले आहेत.

या संदर्भात काही स्पष्टिकरण हवे असल्यास आणि/किंवा काही हरकत असल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत ती आरएसआयएल आणि/किंवा आरआयएल यांच्याकडे खालील स्वाक्षरी करणाऱ्यांकडे ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१ येथे किंवा ई–मेलद्वारा investor.relations@ril.com/investor.relations@jiofinance.com येथे पाठवावी.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता	रिलायन्स स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड करिता
सही/–	सही/–
सावित्री पारेख	व्ही. मोहना
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर	कंपनी सेक्रेटरी

दिनांक : ३१ मे, २०२३
स्थळ : मुंबई

सार्वजनिक सूचना

भारतीय रिझर्व बँकेद्वारा (''आरबीआय'') जारी करण्यात आलेल्या प्रमुख निर्देश – नॉन–बँकिंग वित्तीय कंपनी – सिस्टिमिकली महत्त्वाची ठेवी न स्वीकारणारी कंपनी आणि ठेवी स्वीकारणारी कंपनी (रिझर्व बँक) निर्देश, २०१६ (''आरबीआयचे निर्देश'') मधील परिच्छेद ६९ अन्वये रिलायन्स रिटेल फायनान्स लिमिटेड (''आरआरएफएल''), रिलायन्स इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट्स ॲण्ड होल्डिंग्स लिमिटेड (''आरआयआयएचएल''), रिलायन्स स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टमेंटस लिमिटेड (''आरएसआयएल'') आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (''आरआयएल'') द्वारा संयुक्तरित्या ही सूचना जारी करण्यात येत आहे.

आरआरएफएल (सीआयएन: U17110MH2000PLC123731) ही ठेवी न स्वीकारणारी सिस्टिमकली महत्त्वाची नॉन–बँकिंग वित्तीय कंपनी असून आरबीआयकडे नोंदणीकृत आहे. आरआयआयएचएल (सीआयएन: U65910GJ1986PLC106745) ही आरआयएलच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी असून तिच्याकडे आरआरएफएलच्या १००% इक्विटी समभाग भांडवल आहे. आरएसआयएल (सीआयएन: U65990MH1999PLC120918) ही ठेवी न स्वीकारणारी सिस्टिमकली महत्त्वाची नॉन–बँकिंग वित्तीय कंपनी असून आरबीआयपाशी नोंदणीकृत आहे आणि आरआयएलच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. आरआयएल (सीआयएन: L17110MH1973PLC019786) ही लिस्टेड सार्वजनिक कंपनी आहे.

आरएसआयएल आणि आरआयएल यांच्या संचालक मंडळांनी इतर गोष्टींबरोबरच संपूर्ण वित्तीय सेवा व्यवसायावर लक्ष केंद्रित करणारी स्वतंत्र लिस्टेड कंपनी निर्माण करण्याच्या उद्देशाने आरआयएलचा वित्तीय सेवा व्यवसाय आरएसआयएल मध्ये विलग करण्याच्या व्यवस्थेची योजना (''योजना'') मंजुर केली आहे. सदर योजना आरएसआयएल आणि आरआयएल यांचे भागधारक आणि कर्जदार यांनी मंजुर केली आहे आणि सध्या माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांच्याकडे मंजुरीसाठी बाकी आहे. योजनेची पूर्तता झाल्यानंतर, आरआयआयएचएल द्वारा आरआरएफएलची १००% समभागधारणा आरएसआयएलकडे हस्तांतरित करण्यात येईल आणि आरएसआयएल ही आरआरएफएलची प्रवर्तक असेल.

वरील समभागधारणेतील बदल आणि आरआरएफएलवरील नियंत्रणातील बदल हे आरबीआयने त्यांचे पत्र संदर्भ क्रमांक डीओएस.सीओ.आरएसजी क्र. एस५४७/०२–१३–००१/२०२३–२४ दिनांक २५ एप्रिल, २०२३ अन्वये मंजूर केले आहेत.

या संदर्भात काही स्पष्टिकरण हवे असल्यास आणि/किंवा काही हरकत असल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत ती आरआरएफएल आणि/किंवा आरआयआयएचएल यांच्याकडे खालील स्वाक्षरी करणाऱ्यांकडे ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१ येथे किंवा ई–मेलद्वारा bhavika.shah@ril.com येथे पाठवावी.

रिलायन्स रिटेल फायनान्स लिमिटेड करिता	रिलायन्स इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट्स ॲण्ड होल्डिंग्स लिमिटेड करिता
सही/–	सही/–
भाविका शाह	भाविका शाह
कंपनी सेक्रेटरी	कंपनी सेक्रेटरी
रिलायन्स स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड करिता	रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–	सही/–
व्ही. मोहना	सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी	कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

दिनांक : ३१ मे, २०२३
स्थळ : मुंबई

SBI

एनबीएफसी अलायन्स, कॉर्पोरेट सेंटर, पहिला मजला, बी विंग,
रहेजा चेंबर्स, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट मुंबई – ४०००२१

बिझनेस असोसिएट्सच्या पॅनलमेंटसाठी अर्जाची विनंती

संदर्भ क्र. NBFC ALLIANCES/२०२३/२४/१ दिनांक: ३०.०५.२०२३

भारतीय स्टेट बँकेने कृषी अंतर्गत मायक्रो ॲसेट उत्पादनांच्या सोर्सिंग/हँडलिंगसाठी बिझनेस असोसिएट्स म्हणून काम करण्यासाठी पात्र संस्थांकडून अर्ज मागवले आहेत. अधिक माहितीसाठी **https://www.sbi.co.in**, प्रोक्युअरमेंट न्यूज येथे आणि bank.sbi येथे भेट द्या.

अर्ज डाउनलोड करण्यास सुरू होण्याची वेळ: ३०.०५.२०२३ रोजी पासून
अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ : १९.०६.२०२३, १८:०० वाजेपर्यंत.

एनबीएफसी अलायन्स विभाग

एडेलवीस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कं. लि.

Edelweiss Asset Reconstruction

सीआयएन : यू६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
एडेलवीस हाऊस, सी.एस.टी.रोड लगत, कलिना, मुंबई-४०००९८.

परिशिष्ट-IV-ए (रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा)
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाणवट आहे/ताब्यात आहे, सदर स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा **एडेलवीस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडच्या**, ईएआरसी ट्रस्ट एससी-३६४ ("ईएआरसी")चे विश्वस्त म्हणून क्षमतेत कार्यरत असलेली, म्हणजेच सुरक्षित धनको, प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री **ऋणको म्हणजेच फ्युचरिस्टिक गॅस सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड व हमीदार म्हणजेच १) श्री. विलास मंगेश सावंत; २) दिवंगत श्री. मंगेश मुकुंद सावंत (त्याच्या विधि वारसदारद्वारा दिवंगत असलेले); ३) श्रीमती स्वाती विलास सावंत आणि ४) दिवंगत श्रीमती अनुराधा मंगेश सावंत (त्याच्या विधि वारसदारद्वारा दिवंगत असलेली)** यांच्याकडील सुरक्षित धनकोंना म्हणजेच "ईएआरसी"करिता देय असलेली, उक्त तारखेनंतर अभ्युदया को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड ("अभिहस्तांकनकर्ता बँक")/ "ईएआरसी"द्वारा वसूल केलेली आणि/किंवा स्वीकारलेली कोणतीही रक्कम वजात करण्यात येणारी, पुढील व्याज आणि अन्य किंमत/खर्च यासह एकत्रित **२८ फेब्रुवारी २०२३ रोजीप्रमाणे रु. ६,०१,०२,५१४/- (रुपये सहा कोटी एक लाख दोन हजार पाचशे चौदा फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खालीलप्रमाणे आहे :

राखीव किंमत (रु. लाखांत)	इसारा रक्कम ठेव (इठे) (रु. लाखांत)	बोली वृद्धी (रु. लाखांत)	पाहणीची तारीख	लिलावाची तारीख व वेळ
२००	२०.००	२	०८ जून २०२३	१५ जून २०२३ रोजी दु.१२.०० ते दु.०१.००

लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या सुरक्षित मत्तेचे वर्णन

पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - जमीन त्यावरील स्ट्रक्चरसह, असलेला बंगलो हाउस "वंश दीप" म्हणून ज्ञात असलेला, समाविष्ट तळमजला अधिक एक मजला मोजमापाचा २३०४ चौ.फू. किंवा त्यासुमारे किंवा त्यावरील बांधकाम करावयाचे स्ट्रक्चर, मोठी जमीन सुमारे मोजमापाची ३७४.५० चौ.मी. यापैकी, धारण केलेला सीटीएस नं. ६२/१४, तिरंदाज (पवई)च्या व्हिलेज मर्यादेत स्थित, आयआयटी मेन गेट, पवई, आदिशंकराचार्य रोड, मुंबई-४०००७६ येथे पडून असलेली व स्थित असलेली, तालुका व नोंदणी उप-जिल्हा कुर्ला एमएसडी, त्यातील फर्निचर, फिक्चर्स व फिटिंग्जसह आणि उक्त प्रीमायसेस किंवा कोणताही भाग व पोर्शनकरिता सर्व हक्क, विशेषाधिकार, वहिवाट हक्क व अनुलग्नक यासह एकत्रित आणि श्रीमती अनुराधा मंगेश सावंत यांच्या मालकीची.

लिलाव विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया https://www.edelweissarc.in/Propertysale या "ईएआरसी"च्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा.

अधिक माहितीकरिता, तुम्ही संपर्क साधू शकाल : **संपर्क क्र. +९१ ७४००० ६३६४० आणि/किंवा rishabh.jhabak@edelweissarc.in / vineet.aggarwal@edelweissarc.in** यावरून ईमेलद्वारा.

तारीख : ३१.०५.२०२३
स्थळ : मुंबई

स्वाक्षरी/– प्राधिकृत अधिकारी
एडेलवीस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडकरिता

फॉर्म जी
दिनांकित १०.०४.२०२३ स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या निमंत्रणाकरिता पूरकपत्र क्र.II
(नादारी व दिवाळखोरीच्या विनियम ३६ए(१) अंतर्गत)
(कॉर्पोरेट व्यक्तींकरिता नादारी ठराव प्रक्रिया) विनियम, २०१६

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव-पॅन/सीआयएन/एलएलपी नं.सह	**विजयग्रुप हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड** सीआयएन: यू४५४००एमएच२००९पीटीसी१९७७३७
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	२०५, मरिन चेंबर्स, ४३, न्यू मरिन लाइन्स, मुंबई-४०००२०
३.	वेबसाइटचे यूआरएल	http://www.vijaygroup.com/vijayestate/ (अपडेट केलेले नाही)
४.	स्थळाचा तपशील, जेथे अधितम निश्चित मत्ता स्थित आहे	विजय इस्टेट, व्हिलेज वकास, ता. कर्जत, जि. रायगड
५.	मुख्य उत्पादने/सेवांची प्रतिष्ठापित क्षमता	विकासाकरिता संभाव्य जमिनीच्या अदमासे ८३ एकर्स असलेले रियल इस्टेट प्रोजेक्ट
६.	मागील वित्तीय वर्षात विकलेली प्रमुख उत्पादने/सर्व्हिसेसचे परिमाण व मूल्य	एकूण जमीन ८३ एकर्स, सद्य फेज १ व फेज २, समाविष्ट २४ बिल्डिंग्ज विकासाच्या विविध स्तरांत आहेत.
७.	कर्मचारी/मजूरांची संख्या	माहिती उपलब्ध नाही
८.	दोन वर्षामागील उपलब्ध वित्तीय विवरणे (वेळापत्रकासह) समाविष्ट अधिक तपशील, धनकोंची सूची, प्रक्रियेच्या तद्नंतरच्या घटनांकरिता संबंधित तारखा येथे उपलब्ध आहेत :	सदर माहिती प्राप्त करण्याकरिता यावर लिहा : eoi.cirp.vhpl@gmail.com
९.	संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत ठराव अर्जदारांकरिता पात्रता उपलब्ध आहे :	पात्रता कसोट्या ठराव नियोजन (''निमंत्रण'') सादर करण्याकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीसाठी सविस्तर निमंत्रणामध्ये नमूद केलेल्या आहेत.
१०.	स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या स्वीकृतीची शेवटची तारीख	१० जून २०२३ (अलीकडील ३० मे २०२३)
११.	भावी ठराव अर्जदारांच्या तरतुदीय सूचीच्या निर्गमनाची तारीख	२० जून २०२३ (अलीकडील ०९ जून २०२३)
१२.	तरतुदीय सूचीच्या आक्षेपांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख	२५ जून २०२३ (अलीकडील १४ जून २०२३)
१३.	ईओआय सादर करण्याकरिता ईमेल आयडी प्रक्रिया	eoi.cirp.vhpl@gmail.com

नोंदी :

१. स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता निमंत्रणाबाबत अनुक्रमे पूरकपत्र क्र. २ दिनांकित १० एप्रिल २०२३ व पूरकपत्र क्र. १ दिनांकित ११ मे २०२३ निर्गमित करण्यात आले आहेत. तद्नुसार, ईओआय सादरीकरणाची वेळमर्यादा आणि तत्सम कार्यक्रमांकरिता तारखांमध्ये वाढ करण्यात आली आहे.
२. कॉर्पोरेट ऋणकोच्या धनकोंच्या समितीने आयबीसी, २०१६ च्या सेक्शन २२(३) च्या अनुसार, २५ नोव्हेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या सभेत अंतरिम ठराव व्यावसायिक श्री. आलोक मुरारका यांना पुनर्स्थित करण्याचा निर्णय घेतला आहे. तद्नुसार, अर्ज फाइल केला होता आणि माननीय एनसीएलटीने, तिच्या दिनांकित १५ मार्च २०२३ आदेशाद्वारा (२४ मार्च २०२३ रोजी अपलोड केलेला आदेश), अंतरिम ठराव व्यावसायिकास (मानीव ठराव व्यावसायिक) पुनर्स्थित केले आहे आणि ठराव व्यावसायिक म्हणून नादारी व्यावसायिक **श्री. प्रकाश व्ही. कुकरेजा** (''आरपी'') यांची नियुक्ती केली आहे.
३. अंतरिम ठराव व्यावसायिक (''आयआरपी'')/ ठराव व्यावसायिक (''आरपी'')/ धनकोंच्या समितीस (''सीओसी'') कोणत्याही वेळेस ''ईओआय''करिता निकषांमध्ये बदल करण्याचा एकमेव स्वेच्छाधिकार असणार आहे.
४. आयआरपी/आरपी/सीओसी जे काही असेल त्या कोणत्याही दायित्वाशिवाय आणि कोणतेही कारण न देता प्रक्रिया/अर्ज रद्द करण्याचा किंवा त्यात फेरबदल करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
५. संहितेच्या सेक्शन २९ए अंतर्गत कसोट्या, पात्रता नियम, इ. निर्दिष्ट करीत असलेल्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या (''ईओआय'') सविस्तर निमंत्रणाकरिता eoi.cirp.vhpl@gmail.com यावर ईमेलद्वारा विनंतीसुद्धा करता येईल.

प्रकाश व्ही. कुकरेजा
ठराव व्यावसायिक
नोंदणी क्रमांक : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०२५९९/२०२१-२०२२/१३९९०
तारीख : ३१ मे २०२३
स्थळ : मुंबई

RAYAT SHIKSHAN SANSTHA, SATARA - 415 001
WANTED
(On Purely Temporary basis for the year 2023-2024)

Online applications are invited for the various posts of Assistant Professor on purely temporary basis for various aided, non-aided & B.Voc courses in Rayat Shikshan Sanstha's various colleges affiliated to the Mumbai University, Mumbai.

Note :- For detailed information please visit Rayat Shikshan Sanstha's website : **https:// teaching.rayatrecruitment.com**

Secretary,
Rayat Shikshan Sanstha,Satara

SBI

एनीटाईम चॅनेल्स, कॉर्पोरेट सेंटर,
तीसरा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर आर्केड, कफ परेड, मुंबई – ४००००५

निविदा आमंत्रित करण्याप्रती सूचना

भारतीय स्टेट बँक द्वारे ६७५० शाखा XV फेज अंतर्गत CAPEX ATMs च्या खरेदीसाठी दिनांकित ३१.०५.२०२३ आरएफपी क्र. SBI/ACV/२०२३–२४/००१ अंतर्गत पात्र बोलीदारांकडून बोली मागवत आहे. बोली सादर करण्यासाठी इच्छुक बोलीदारांनी बँकेच्या वेबसाइट **https://bank.sbi** वर **'प्रोक्योरमेंट न्यूज'** भेट द्या आणि पोर्टल **https://gem.gov.in** येथे भेट द्यावी.
आरएफपी डाउनलोड करण्याचा कालावधी: ३१.०५.२०२३ दुपारी ०५:०० वाजल्यापासून
बोली लावण्याची अंतिम तिथी आणि वेळ: २१.०६.२०२३ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत

स्थान: मुंबई
दिनांक: ३०.०५.२०२३

स्वाक्षरी/–
उप महाव्यवस्थापक
(अंमलबजावणी व रोल आउट)

GFL LIMITED

Registered office: 7th Floor, Ceejay House, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai – 400 018
CIN: L65100MH1987PLC374824 • **Tel. No.:** +91- 22 4032 3851 • **Fax No.:** +91- 22 4032 3191
Website: www.gfllimited.co.in • **Email ID:** contact@gfllimited.co.in

EXTRACT OF AUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31 MARCH 2023

(Rs. in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended		Year ended	
		31-03-2023	31-03-2022	31-03-2023	31-03-2022
1	Total Income from continuing operations	88	86	347	258
2	(Loss) / Profit for the period/year before tax from continuing operations (Before exceptional Items)	(5,499)	41	(5,418)	(416)
3	Profit / (Loss) for the period/year before tax from continuing operations (After exceptional Items)	239,528	41	239,609	(346)
4	Profit / (Loss) for the period/year after tax from continuing operations (After exceptional Items)	225,821	20	225,869	(411)
5	Loss from discontinued operations after tax	-	(2,819)	(2,369)	(23,943)
6	Profit / (Loss) for the period/year	225.821	(2,799)	223,500	(24,354)
7	Total Comprehensive Income for the period (Comprising Profit/ (Loss) for the period/year after tax and Other Comprehensive Income after tax)	225,855	(2,757)	223,522	(24,262)
8	Paid-up equity share capital (face value Re. 1 per share)	1,099	1,099	1,099	1,099
9	Other Equity (excluding revaluation reserves)			260,175	34,203
10	Basic and Diluted Earnings/Loss per share (face value of Re.1/- each)	*	*		
	From continuing operations	205.57	0.02	205.62	(0.37)
	From discontinued operations	-	(2.57)	(2.16)	(21.80)
	From total operations	205.57	(2.55)	203.46	(22.17)

*not annualized

Notes:

1. The above results were reviewed by the Audit Committee and were thereafter approved by the Board of Directors at its meeting held on 30 May 2023. The Statutory Auditors of the Company have carried out the audit and have issued their unmodified opinion on the financial statements.
2. The above results are an extract of the detailed format of Annual Financial Results filed with the stock exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the audited Quarterly and Yearly standalone and consolidated Financial Results are available on the Stock Exchanges' website (www.bseindia.com and www.nseindia.com) and on the Company's website (www.gfllimited.co.in).
3. The Board of Directors of the erstwhile INOX Leisure Limited (which was a subsidiary of the Company), at its meeting held on 27 March 2022, approved a Scheme of Amalgamation ("the Scheme") of INOX Leisure Limited ("the Transferor Company") with PVR Limited ("the Transferee Company"). As per the Scheme, the share exchange ratio was 3 equity shares of the face value of Rs. 10 of the Transferee Company, credited as fully paid-up, for every 10 equity shares of the face value of Rs. 10 each fully paid-up held by such member in the Transferor Company. Over time, the Scheme had received all the necessary approvals from the authorities and a certified copy of the National Company Law Tribunal order was filed with the Registrar of Companies (ROC) on 6 February 2023 i.e. the effective date of the merger. The appointed date was 1 January 2023. Upon the Scheme becoming effective, the Transferor Company stood dissolved, without following the procedure of winding up. As per the Scheme, on the merger of the Transferor Company with the Transferee Company, the Group has received 1,59,86,114 fully paid-up equity shares of the Transferee Company, which represents 16.32% of the total paid-up equity capital of the Transferee Company.
   This merger has resulted in a loss of control of the Group over its erstwhile subsidiary, viz. INOX Leisure Limited, w.e.f. 1 January 2023 i.e. the appointed date and has been considered as a deemed disposal of subsidiary, and accordingly, the erstwhile subsidiary company's business has been presented as discontinued operations and its results are presented separately in the consolidated statement of profit and loss and consolidated statement of cash flows for all the periods presented. On loss of control, the assets and liabilities of the Transferor Company along with related NCI are derecognised and the Group's interest in the Transferee Company is recognised at fair value. The resultant gain on deemed disposal of subsidiary amounting to Rs. 2,45,027 lakhs, is included in the statement of profit and loss and shown as exceptional item.
4. **Information on Standalone Financial Results:**

(Rs. in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended		Year ended	
		31-03-2023	31-03-2022	31-03-2023	31-03-2022
1	Total income from continuing operations	80	81	322	218
2	Net Profit for the period / year before tax from continuing operations (After exceptional Items)	246,694	48	246,771	147
3	Net Profit for the period / year after tax from continuing operations (After exceptional Items)	232,359	32	232,408	97
4	Total comprehensive income for the period/year (Comprising profit for the period/year and Other Comprehensive Income)	232,381	32	232,429	97

On behalf of the Board of Directors
For GFL Limited

Devendra Kumar Jain
Chairman & Managing Director
DIN: 00029782

Place : Delhi
Date : 30 May 2023